# महिला दिनाचे सोंग भारतात नाचवू नका

८ मार्चला 'आंतरराष्ट्रीय महिला दिन' आहे आणि तो आपण गेली काही वर्षे भारतात साजरा करू लागलो आहोत. या वर्षी तर महाराष्ट्र सरकारने ८ ते ११ मार्च महिला दिनानिमित्त शासकीय कार्यक्रम जाहीर केले आहेत. हा खुळचटपणा पाश्चिमात्य देशांतून भारतात आला आहे आणि भारतात हे सोंग नाचवता कामा नये. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून बैलगाडीची दोन चाकं बरोबरीने चालायची असतील तर महिलेला विशेष स्थान देऊन तिला दुबळं, कमकुवत बनविणं सर्वात आधी बंद केलं पाहिजे. 'महिला दिन' साजरा करण्यातून संदेश जातो की, महिला या वेगळ्या आहेत, त्यांच्यासाठी विशेष काही करायला हवे, त्या अबला आहेत, त्यांचे संरक्षण करायला हवे. हा असा संदेश पसरवून तो जर महिलांच्या विचारात रुजला तर पुढे जाऊन या महिला मनाने पांगळ्याच राहतील. आपल्याला विशेष मदत मिळावी यासाठी याचना करीत राहतील.

पाश्चिमात्य संस्कृतीत कुटंबापेक्षा व्यक्तीस्वातंत्र्याला अधिक महत्त्व आहे, नात्यांपेक्षा व्यवहाराला श्रेष्ठ ठरविले आहे, षड्रिपूंवर नियंत्रण ठेवण्यापेक्षा षडरिपूंची गुलामी अधिक प्रचलित आहे, आचारांची मर्यादा राखण्यापेक्षा स्वैराचारात रमणे आवडते, आत्मशांतीपेक्षा शरीर सुखाकडे कल आहे. पाश्चिमात्य देशांत मुलगा/ मुलगी १८ वर्षांचे झाले की त्यांना घर सोडून जावे लागते आणि जर आईवडिलांच्या घरात राहायचे असेल तर त्यांच्याकडून आईवडील भाडं घेतात. पाश्चात्य संस्कृती चांगली की वाईट हा आजचा विषय नाही. पण ती संस्कृती आपल्या विचारधारेशी सुसंगत नसतानाही ती आपल्यावर थोपवून घेण्यात धन्यता कसली?

पाश्चिमात्य देशात महिला दिन साजरा करू लागल्यावर आपल्याकडेही लगेच ही टूम आली. पण तिकडे १९ नोव्हेंबरला आंतरराष्ट्रीय पुरुष दिन साजरा होतो हे आपण सोयीने स्वीकारले नाही. महाराष्ट्राच्या सरकारने १९ नोव्हेंबरला पुरुष दिनही साजरा करावा.

**संपादकीय**

**जयश्री खाडिलकर-पांडेकृत**

महिला आणि पुरुष दोघांचेही वेगवेगळे प्रश्न आहेत त्यांची चर्चा या दोन दिवशी झाली तर समान वागणूक दिल्याची भावना येते. ही भावना खूप महत्त्वाची आहे. कारण मनात जे रुजवलं जातं त्यावरच कळतनकळत आयुष्याचे सर्व निर्णय घेतले जातात.

महिला दिनाचा कार्यक्रम असतो आणि व्यासपीठावर पुरुषांची गर्दी असते, प्रमुख पाहुणे पुरुष असतात, बहुतेक ठिकाणी केवळ मनोरंजनाचे कार्यक्रम असतात, बक्षिसेही तव्यापासून डब्यापर्यंतच ठेवली जातात, खेळ ठेवले तर तेही चमचा लिंबू नाहीतर बटाटे उचलण्याचेच खेळ असतात. महिलांची आपण एक चौकट ठरवली आहे. त्या चौकटीबाहेर तिला जाऊ द्यायचे नाही हेही ठरवले आहे. महिला दिन साजरा करायचा आणि कार्यक्रमात ही चौकट अगदी ठसठशीतपणे तिच्या मेंदूत बिंबवायची हा प्रकार सुरू असतो. कर्तृत्ववान स्त्री म्हणून तुम्हाला काय त्रास झाला असा प्रश्न हमखास विचारायचा आणि शेवटी तिला फ्रायपॅन भेट द्यायचा, यातून प्रगती होईल की अधोगती होईल? महिलेला फ्रायपॅन का दिलं जातं? तिला पेनड्राईव्ह का देत नाही? महिला दिनी फूटबॉलचा सामना आणि पुरुषदिनी चमचा लिंबूच्या स्पर्धा झाल्या तर.....

अगदी किड्यापासून हिंस्त्र प्राण्यापर्यंत देवाने नर आणि मादीची निर्मिती केली आहे आणि त्यात शरीररचना सोडली तर कुठेही अन्याय केलेला नाही. दोघांच्याही भूमिका समतोल राखल्या आहेत. भारताचा प्राचीन इतिहास पाहिला तर जितके थोर पुरुष होऊन गेले तितक्या थोर महिला होऊन गेल्या आहेत.



संहिता लक्ष्मीकांत जोशी या तरुणीने मोलाची माहिती देताना सांगितले की, वेदात ऋषींनी रचलेली सुक्त आहेत तशी ऋषिकांनी रचलेलीही सुक्त आहेत. वेदांत त्यांना स्थान आहे. ऋषी याज्ञवल्कीय यांची पत्नी मैत्रेयी ही उच्चकोटीची ऋषिका होती. तिची स्वतंत्र वैदिक शाखा आहे. गार्गी वाचकनवी आणि याज्ञवल्कीय ऋषी यांच्यातील संवादाला महत्त्वाचे स्थान आहे. अगस्त्य मुनींची पत्नी लोपामुद्रा, अपाला, इंद्राणी, घोषा अशा अनेक ऋषिकांनी रचलेली सुक्त वेदांत आहेत. प्रसिद्ध गणितज्ज्ञ भास्कर यांनी ११५० आपली कन्या लीलावती हिला सहजसुंदरपणे गणित समजावे म्हणून 'लीलावती' याच नावाने संस्कृतात कविता रचली. प्राचीन काळची अशी असंख्य उदाहरणे देता येतील. त्यानंतरच्या काळात राजमाता जिजाऊ, राणी लक्ष्मीबाई, राणी पद्मावती, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यापासून समाजसुधारणेचे व्रत घेणाऱ्या माता रमाबाई आंबेडकर ते क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्यापर्यंत अनेक उत्तुंग व्यक्तिमत्त्वांनी समाजात बदल घडवला. समाज चुकीच्या वळणाने वाटचाल करू लागल्यावर या समाजाला सन्मार्गावर आणण्यासाठी जेव्हा जेव्हा महापुरुषांनी जन्म घेतला तेव्हा तेव्हा एका महान स्त्रीनेही जन्म घेतला हेच इतिहास सांगतो. याची उजळणी करायची की स्त्रीला 'अबला' ठरवून तशाच पद्धतीने महिला दिन साजरा करायचा, याचा निर्णय व्हायलाच हवा.

आपण देवदेवतांनाही एकत्र पुजतो, जिथे विठ्ठल आहे तिथे रुक्मिणी आहे, जिथे कृष्ण आहे तिथे राधा आहे, जिथे राम आहे तिथे सीता आहे, ज्ञानाची देवी सरस्वती, धनप्राप्तीसाठी लक्ष्मी, काली माता, पार्वती माता, कोल्हापूरची अंबाबाई ही तर आपली शक्तिस्थळं आहेत. संत ज्ञानेश्वरांच्या आठवणीसह संत मुक्ताईची आठवण येतेच. प्राचीन काळापासून स्वातंत्र्यलढ्यापर्यंत स्त्री-पुरुषांचे समान कार्यबळ होते. मग स्त्री-पुरुष असमानता रुजवू देण्याचे पाप आपण केलेच कसे? 'क्षुद्र, स्त्री आणि कुत्रा' यांना प्रवेश नाही या पाट्या ज्या काळात लागल्या त्या काळात आपल्या मेंदूत असमानतेची कीड पसरली. दुर्दैवाने ही कीड वाढत गेली आणि ही असमानता मनात बिंबवण्याची पुढीच पायरी म्हणजे महिला दिनाचा उत्सव आहे. मुलगा आणि मुलीच्या जन्मानंतर पेढा आणि बर्फीचा फरक नको, मुलाला नोकरी आणि मुलीला स्वयंपाक ही चौकट नको, दोघांना समान शिक्षण, समान संधी हवी हे विचार घेऊन दोघेही आपले वारस आहेत अशा तऱ्हेने आईवडील वागले तर दोघेही सक्षम बनतील. बालपणापासून या गोष्टी पाळल्या नाहीत तर मनातच भेदभाव रुजेल आणि हा मनातील भेदभाव 'महिला दिना' मुळे अधिक घट्ट होईल. आम्ही तीन बहिणी आहोत, पण 'मुलगा नाही तर वृत्तपत्र कोण चालवणार' हे वाक्य आम्ही कधीही घरात ऐकलं नाही. नीलकंठ खाडिलकर आणि सौ. मंदाकिनी खाडिलकर या माझ्या आईवडिलांनी आम्हाला दिलेला हा सर्वात मोठा वारसा आहे.

आजच्या युगात काय करायला हवे?

महिलांवरील शारीरिक अत्याचार, छेडछाड, हुंडाबळी ही प्रकरणे जलदगती न्यायालयात चालवावी, महिलेची तक्रार पोलीस स्थानकात घेतली नाही तर संबंधित पोलीस अधिकाऱ्याला ताबडतोब निलंबित करून त्याची चौकशी व्हावी, महिला सासरी जातात त्याप्रमाणे पुरुषांनी सासरी जाण्याचीही पद्धत असावी अशा विषयांवर गंभीर चर्चा होऊन निर्णय घेणे गरजेचे आहे. त्याचबरोबर स्त्रीस्वातंत्र्याचा अतिरेक करीत मुलाच्या घरी 'कचरा' (आईवडील) नाही ना? याची चौकशी लग्न ठरविताना करणाऱ्या मुलींचे प्रबोधन करणे आवश्यक आहे. हे सर्व एक दिवसाचे चर्चेचे विषय नाहीत. प्रदीर्घ चर्चा होऊ यावर निर्णय आणि सततचे प्रबोधन हा योग्य मार्ग आहे.